Shantaram Thakare (FCA, B-com)
Janardhan Galande (FCA, M-com)
Ravindra Misal (FCA, M-com)

Thakare Galande Misal & Co
Chartered Accountants

Head Office : 202, Durvankur Pride Apartment, Bajirao Nagar, Tidke Colony, Nashik - 422008
+91 9403533898 tgm.nsk@gmail.com

## वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

**(महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा कलम 81(5-अ) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम 69 अन्वये दयावयाचा)**

आम्ही, इंदिरा महिला सहकारी बँक लि. मालेगांव, नाशिक या बँकेचा सोबत जोडलेला दि. ३१.०३.२०२६ अखेरीचा ताळेबंद आणि त्याच दिवशी संपणा-या वर्ष अखेरीचे सोबत जोडलेले नफा तोटा पत्रक यांचे लेखापरिक्षण केले.सदरची आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची असून या आर्थिक पत्रकांच्या लेखापरिक्षणावर आधारित माझे मत व्यक्त करण्याची जबाबदारी माझी आहे.

सामान्यत: भारतात मान्य असलेल्या लेखापरिक्षणाच्या दर्जास अनुसरुन मी बँकेचे लेखापरिक्षण केले आहे. दर्जानुसार असे अपेक्षित आहे की, मी लेखापरिक्षणाचे नियोजन करुन ते प्रत्यक्षात करतांना मिळालेली आर्थिक पत्रकेही परिणामकारक अशा चुकीच्या माहितीपासून मुक्त असल्याची तर्कसंगत दृष्टया खात्री करावी. लेखापरिक्षणामध्ये आर्थिक पत्रकात दिलेली माहिती आणि रक्कमा यांच्या पृष्ठयर्थ दिलेल्या पुराव्यांची अंशत: तपासणी करण्याचा समावेश होतो. लेखापरिक्षणामध्ये व्यवस्थापनाने अनुसरलेली हिशोबाची तत्वे आणि महत्वाचे अंदाज यांचा आढावाघेणे तसेच दाखल केलेल्या सर्वसाधारण आर्थिक पत्रकांचे मुल्यमापन करणे याचाही समावेश आहे. मला विश्वास आहे की, माझ्या लेखापरिक्षणाचा माझ्या मतांना पुरेसा आधार आहे. अहवालातील परिशिष्ठानुसार आमच्या शे-यास पात्र राहुन खालीलप्रमाणे दाखला देण्यात येतो की,

१. आम्ही आमच्या माहिती व ज्ञानास अनुसरुन लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे.
२. आमच्या मते सहकारकायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य तीहिशोबाची पुस्तके बँकेनेठेवलेली आहेत असे आमच्या तपासणीत दिसून आले आहे.
३. बँकेच्या तपासणीशी संबधीत असलेली तेरीज, ताळेबंद आणि नफा तोटा पत्रके ही कायद्यातील तरतुदीनुसार निर्धारित केलेल्या हिशोबाच्या पुस्तकांशी सुसंगत आहे.
४. आमच्या मताप्रमाणे व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हास देण्यात आलेल्या स्पष्टिकरणाप्रमाणे महाराष्ट्र को-ओपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट 1960 आणि त्याखालील नियमानुसार आवश्यक आहे तशी प्राप्त झालेली असून ती भारतामध्ये साधारणत: मान्य असलेल्या हिशोबाच्या तत्वांशी जुळत आहेत

आणि सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवालातील नमुना -१ व नमुना -७ , भाग- अ, ब आणि क मधील आमच्या शे-यास अनुसरुनखालील हिशोबपत्रके सत्य व योग्य असल्याचे दर्शवितात.

अ. दि. ३१.०३.२०२६ अखेरच्या तेरीज ताळेबंदात दर्शविलेल्या आर्थिकस्थिती संदर्भात

ब. दि.३१.०३.२०२६ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाच्या नफातोटा पत्रकात दाखविलेल्या नफया संदर्भात सन २०२५-२६ सहकारी वर्षासाठी बँकेला लेखापरिक्षण वर्ग (अ) देण्यात आला आहे.

ठाकरे गलांडे मिसाळ आणि कंपनी करीता,
चार्टर्ड अकौटंट्स
फर्म रजि. नं.१२८६६१W




सी.ए. रविंद्र मिसाळ
भागीदार
मे.न.१४४७०३
ठिकाण: नाशिक
दिनांक: २९.०६.२०२६
UDIN: **26144703MUNPEN4777**